# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३ ००१

## आरोग्याधिकारी यांचे कार्यालय

E-mail:- mohsolapur@gmail.com

जा.क्र.आअ/आस्था-२ -५६८ दि. २३-१२-२०२४

**अत्यंत तातडीचे व महत्वाचे**

## -: कार्यालयीन परिपत्रक :-

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत घरी होणाऱ्या मृत्यू प्रकरणातील (non institutional deaths) अर्जदाराकडून प्राप्त झालेल्या MCCD FORM 4A (Medical Certification of Cause of Death) मधे मृत्यूचे वैद्यकीय कारण हे चुकीच्या पद्धतीने नमुद होत असल्याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडून सातत्याने विचारणा होत असते. मृत्यूचे कारण हे **ICD 10th CM (International Classification of diseases 10th Revision- Clinical modification)** यानुसार भरणेबाबत जागतिक आरोग्य संघटनेचे निर्देश आहेत. MCCD FORM 4A योग्य रितीने न भरल्यामुळे आपल्या शहरात होणाऱ्या मृत्यूंची कारणमीमांसा करून पुढील आरोग्य विषयक धोरण निश्चित करताना अडचण निर्माण होण्याची शक्यता असते.

घरी मृत्यू झालेल्या प्रकरणांची पडताळणी (मौखिक शवविच्छेदन / Verbal Autopsy) ही संबधित नागरी आरोग्य केंद्राच्या ANM/PHN व वैद्यकीय अधिकारी करत असतात. सदर विषयाचे गांभीर्य लक्षात घेता. **दि.०१/०१/२०२५** पासून संबंधित नागरी आरोग्य केंद्राच्या ANM/GNM यांनी गृहभेटीदरम्यान केलेल्या मौखिक शवविच्छेदनाच्या आधारे MCCD FORM 4A हा संबंधित नागरी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी यांनी सही - शिक्क्यानिशी भरून द्यावा. खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांनी भरून दिलेला MCCD FORM 4A यापुढे स्वीकारण्यात येणार नाही.

आरोग्याधिकारी कार्यालयाकडून यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे हा form विनामुल्य तसेच विनाविलंब, बिनचुक भरून देण्यात यावा. या आदेशाची विनाविलंब, तात्काळ व प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी.

याबाबत काही अडचण असल्यास उपनिबंधक, जन्म - मृत्यू / विवाह नोंदणी विभाग, आरोग्य खाते सो.म.पा. यांचेकडे संपर्क करावा.

**(आशिष सुमन सुधाकरराव लोकरे)**
**उप-आयुक्त**
**सामान्य प्रशासन विभाग**

**प्रत माहितीस्तव,**

१. मा. आयुक्त तथा प्रशासक, सो.म.पा
२. उपनिबंधक, जन्म-मृत्यू विभाग, सो.म.पा
३. वैद्यकीय अधिकारी, नागरी आरोग्य केंद्र १ ते १५,